17-18

ISSN [illegible]
IMPACT FACTOR [illegible] (UIF)

# Historicity

International Research Journal


UGC APPROVED

VOLUME-IV JAN.2018

**SPECIAL ISSUE**

Theme

## Contemporary History and Research Methodology



| | | |
|---|---|---|
| 23 | कबीर के विचारों की प्रासंगिगता<br>प्रा.डॉ.नवनाथ गाडेकर | 85 |
| 24 | अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास<br>प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर | 87 |
| 25 | डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : एक अभ्यास (१८८८ - १९४९)<br>प्रा. डॉ. मनिषा माणिकराव जगदाळे (कुरुमकर) | 90 |
| 26 | महानुभाव संप्रदायाची वर्णजातिव्यवस्था विरोधी भूमिका<br>दिगंबर शिवाजी वाघमारे | 93 |
| 27 | महात्मा फुलेंचे स्त्रि-पुरुष समानतेविषयक विचार व कार्य<br>Shri.Narayan Dattatray Bansode | 95 |
| 28 | क्रांतीसिंह नाना पाटील यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान<br>प्रा.डॉ.ए.एस.टिके | 99 |
| 29 | राष्ट्रीय ग्रंथ : भारतीय संविधान - आंबेडकरी विचारांचा सर्वोच्च मानबिंदू<br>प्रा. शशिकांत रघुनाथ वाघमारे | 101 |
| 30 | शेतकरी चळवळ व गोपीनाथराव मुंडे<br>प्रा. डॉ. शेप बाबासाहेब केशवराव | 105 |
| 31 | पूर्वखानदेश जिल्ह्यात देवकीनंदन नारायण यांचे खादी प्रचार-प्रसार कार्यातील योगदान<br>प्रा.डॉ.दिनेश रामदास महाजन | 108 |
| 32 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार<br>प्रा.टी.एच.आघाव | 110 |
| 33 | सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय मका पीक विविधतेचा समकालीन अभ्यास<br>प्रा. डॉ. लोंढे सी. बी. | 113 |
| 34 | आधुनिक भारताच्या जलनीतीचे प्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. कृष्णा कांबळे | 115 |
| 35 | पर्यटन आणि इतिहास<br>VIJAYA H. GAIKWAD | 117 |
| 36 | स्त्रीवादी दृष्टिकोन : एक अभ्यास<br>प्रा.डॉ.हणमंत महादेव लोंढे | 119 |
| 37 | समाज सुधारकांचे स्त्री सुधारणेचे समकालीन महत्व<br>डॉ. मोरे डो.ए. | 121 |
| 38 | विश्व भाषाओं में हिंदी का महत्व<br>प्रा.अनिल जाधव | 123 |
| 39 | कान्होजी जेधे यांचे स्वराज्यातील योगदान<br>डॉ. संतोषकुमार धनसिंग कांबळे | 125 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि चळवळ<br>Dr. Prof. Kamble H. K. | 127 |
| 41 | २० व्या शतकातील कामगार चळवळीची पार्श्वभूमी<br>प्रा.डॉ. सुनिल शिवमुर्ती रजपूत | 129 |
| 42 | आटपाडी तालुक्यात कृषी पीक पध्दतीमध्ये झालेले बदल<br>सौ. देशमुख सुजाता सचिन | 131 |
| 43 | सांस्कृतिक पर्यटन मीमांसा<br>प्रा.भास्कर टेकाळे | 134 |
| 44 | छ.शाहू महाराज व फत्तेसिंह भोसले संबंध - एक अभ्यास<br>Prof.Dr. Ghatule S. S. | 136 |
| 45 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य<br>Prof. Sarla Bramhdeo Chavan | 138 |
| 46 | अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचार व प्रसारामध्ये कॉम्रेड डी.[illegible] यांचे योगदान<br>प्रा. विधाटे गणेश शंकर | 142 |
| 47 | महिला कामगार आणि मानवाधिकार<br>प्रा.सौ. कापशीकर धनश्री रामचंद्र | 147 |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

Historicity International Research Journal
SPECIAL ISSUE
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Contemporary History and Research Methodology

# २० व्या शतकातील कामगार चळवळीची पार्श्वभूमी

प्रा.डॉ. सुनिल शिवमुर्ती रजपूत
इतिहास विभागप्रमुख,
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, अणदूर.

## प्रास्ताविक

१८ व्या शतकातील मध्यंतरात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली आणि बघता बघता उदयोगधंदे व कारखानदारी निर्माण होण्यास मदत झाली. संपूर्ण जगभर नवीन आधुनिक काळात कामगार हा घटक कारखानदारीनंतर मोठ्या संख्येत निर्माण झाला. त्यामुळे कामगार वर्ग आपले व्यक्तिगत प्रश्नापेक्षा सामुहिक स्वरुपाचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटित होऊन एकत्र येवू लागला. या मधूनच कामगारहित, कल्याण व सर्वांगिण प्रगतीचे उद्दिष्टे गाठण्यासाठी चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. यातूनच कामगार चळवळींचा विकास होत गेला. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये २० व्या शतकातील कामगार चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करण्यात आली आहे.

## पार्श्वभूमी

१८ व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. त्या दरम्यान इंग्रज भारताचे साम्राज्यकर्ते झाले. औद्योगिक क्रांतीमुळे भारतात सुतीवस्त्र उद्योग, पटसन उद्योग, लोखंड व इस्पात उद्योग, कोळसा उद्योग, काच उद्योग, रसायन उद्योग आणि मशिन औजारे उद्योगांचा विकास भरपूर प्रमाणात झाला.

अमेरिकेतील यादवी युध्द १८६१ ते १८६५, रेल्वे दळणवळण साधनातील वाढ, रस्ते निर्मिती, राष्ट्रीयता व पुर्नजागरणाची भावना सावकर व्यापारी व बँकर्स इंग्रज व्यापारी, औद्योगिक विकासाची नवीन विचारधारा स्वदेशी वस्तुंचा पुरस्कार आणि पहिले महायुध्द यामुळे देशात औद्योगिक विकास होण्यास मदत झाली. ब्रिटिशांनी भारतात मोठ्या प्रमाणात उद्योग व कारखाने सुरु करून त्यांच्या गरजा पूर्ण करुन घेण्याचा प्रयत्न केला. १८५३ मध्ये आगगाडी, रेल्वे निर्मितीचा पहिला कारखाना उभा झाला, तर १८५४ मध्ये नानाभाई कावसजी या पारशी गृहस्थाने मुंबई येथे आधुनिक स्वरुपाचा वस्त्रोदयोग (गिरणी) सुरु केले त्याचा हळूहळू विस्तार होऊन १९१४ मध्ये देशात वस्त्रोद्योगाची (गिरणी) संख्या ३६४ होती तर सुत मिलची संख्या ६४ होती या कालखंडात स्वदेशी वस्तुंच्या प्रचारामुळे वस्त्रोद्योगाचा विकास होत गेला. रेल्वेच्या निर्मिती बरोबरच कोळसाला मागणी वाढली. त्यामुळे मध्यप्रदेश,राणीगंज,धनबाद व इतर काही ठिकाणी कोळसाच्या खाणींची मोठया प्रमाणात निर्मिती झाली. लोखंड-पोलाद, साखर, कागदी, उदयोगाचाही प्रचंड विकास झाला. १८६९ मध्ये सरकाने चमड्याचा कारखाना काढला, १९३१ मध्ये टाटा नगर येथे लोखंड व पोलादाचा कारखाना उघडण्यात आला. पहिल्या महायुध्दाच्या काळात विविध गरजांच्या पूर्तीसाठी अनेक प्रकारच्या उद्योगांचा विकास झाला.

## कामगारांच्या संख्येत वाढ

भारतात जसजसा विविध उद्योगधंदयांचा विकास झाला तसतशी कामगारांच्या संख्येत देखील वाढ होत गेली. १८८६ मध्ये वस्त्रोद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या ७४००० होती तर १९०५ मध्ये हीच संख्या १९५००० झाली. १९०४ मध्ये कोळसाच्या खाणीत काम करणाऱ्या कामगारांची संख्या ७५४१९ इतकी होती.

## कामगारांच्या समस्या

भारतात उद्योगधंदयाचा विकास होत गेला परंतू कामगारांच्या समस्या सुध्दा वाढत गेल्या. कामगारांना मिळणारे कमी वेतन, काम करण्याची निश्चित नसलेली वेळ, मील व कारखान्यामधील घाणीचे साम्राज्य व त्यामुळे कामगारांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, आवश्यक सुविधांचा अभाव, व्यवस्थापक व कारखानदाराकडून होणारे अन्याय व अत्याचार, कामगारांच्या भरतीतील गोंधळ, कारखान्याच्या आसपास कामगारांच्या निवासाची सोय नसणे, कामगारांची भरती ठेकेदारांमार्फत केली जात असल्यामुळे ते आर्थिकदृष्टया ठेकेदारांवरच अवलंबून असत. यासारख्या अनेक समस्या कामगारांपुढे होत्या.

## कामगार चळवळीचे अग्रदूत - नारायण मेघाजी लोखंडे

कामगार चळवळीचे अग्रदूत नारायण लोखंडे उल्लेख केला जातो. त्यांनी आपल्या सामाजिक कार्याला सन १८७० पासून सुरवात केली. सुरवातीला ते 'दीनबंधु'चे संपादक होते. या वृत्तपत्रातून त्यांनी कामगारांचे प्रश्न, दुःख सोडविण्याचा प्रयत्न केला. याचवेळी मुंबईतील गिरणी मालकांनी 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' ही संघटना स्थापन करुन आपले हित जपण्याचे प्रयत्न केले. दरम्यानच्या काळात कामगारांच्या समस्या वाढतच होत्या कामगारांच्या कामाच्या तासाविषयी कोणतेही नियोजन नव्हते. वेळापत्रक व ऑफिस काम अनिश्चित होते. सर्वोदयाच्या उजेडापासून सुर्यास्त व पूर्ण अंधार होईपर्यंत हिवाळ्यात १२ ते १३ आणि उन्हाळ्यात १३ ते १४ तास काम करुन घेत सणाच्या वेळी अर्धा दिवस काम बंद राही बाकी सुट्या नसत. 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'चे १६ नियम हे दिखाऊ स्वरुपात होते. मात्र ते प्रत्यक्षात पाळले जात नसत अशा या स्थितीनेच नारायण मेघाजी लोखंडेला कामगार जीवनासाठी चळवळ हाती घेण्यास प्रेरित केले होते. सरकारने १८८१ मध्ये 'फॅक्टरी अॅक्ट' मंजूर केला यावेळी लोखंडेंनी 'इंडियन स्पेक्टेटर' व 'राफ्ट गोफ्तर' या दोन पत्रामधून कामगारांची संघटना असावी अशी गरज व्यक्त केली. यातूनच पुढे जावून कामगारांच्या हितासाठी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

१८८४ मध्ये लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल असोसिएशन' ही देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. या चळवळीला आकार देण्यात सर्वात अग्रणी होते ते नारायण मेघाजी लोखंडे. महाराष्ट्राप्रमाणेच देशभरातील चळवळीतही त्यांचे नाव या चळवळीच्या उभारणीसाठी अग्रदूत म्हणून घेतले जाते. अशा स्वरुपात उत्तरोत्तर संपूर्ण भारत भर कामगार चळवळीचा आज विकास होत असलेला दिसून येत आहे.

## २० व्या शतकाच्या सुरवातीच्या कामगार चळवळी

२० व्या शतकाच्या सुरवातीच्या कालखंडात जहालवादाचा प्रभाव हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीवरती परिणामकारक ठरत होता. यामुळे विविध घटनांचे परिणाम कामगार चळवळीवर होणे अनिवार्य होते. १९०६ मध्ये मुद्रणालयात काम करणाऱ्या कामगारांची प्रिंटर्स युनियन (कलकत्ता) स्थापन केली. दरम्यान बंगालच्या फाळणीचे पडसाद देशभर पसरले. राष्ट्रप्रेमीमुळे कामगारांनी यावेळी विविध संप केले. याचवेळी पोस्ट खात्यातील कामगारांनी संघटीत होऊन १९०७ मध्ये 'बॉम्बे पोस्टल युनियन' संघटना स्थापन केली. तर 'द युनियन ऑफ वारपर्स' अहमदाबाद ही संघटना १९०७ मध्येच स्थापन झाली. 'विसाव्या शतकाचे पहिले दशक संपण्यापूर्वीच १९१० मध्ये कामगार हितवर्धक स्वभाव 'सोशल सर्व्हिसलीग' या संघटना स्थान होऊन या चळवळीस गती आली.

२० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकामध्ये जगावरती पहिल्या महायुध्दाचे वारे वाहू लागले होते. दरम्यानच्या काळामध्ये रशियन राज्यक्रांतीने कार्ल मार्क्सची साम्यवादी घोषणा जगातील कामगारांनी एक व्हा! प्रभावित केले. अनुसूचित यांनी अहमदबाद येथे गांधीजींच्या मार्गदर्शनात कामगारांचा एक संघ बनविला. १९१८ साली 'द क्लार्क युनियन ऑफ बॉम्बे' ही संघटना स्थापन झाली. याच वर्षी बी.बी. वाडयांनी मद्रासमधील तीन सुती मिलमधील कामगारांची मिळून 'द मद्रास लेबर युनियन' ही संघटना स्थापन केली. येथूनच २० शतकातील कामगार चळवळीस गती प्राप्त झाली.

## निष्कर्ष

औद्योगिक प्रगतीमुळे भारतात विविध क्षेत्रांतील कामगारांनी आज स्वतंत्र संघटना स्थापन केल्या. पण आज भारतीय उद्योगधंद्यांचा विकास करत असताना भारताचे केवळ 'मेक इन इंडिया' करुन चालणार नाही तर उद्योगधंदयांच्या विकासाबरोबरच कामगारांच्या मूलभूत स्वरुपांच्या समस्या सोडविण्यासाठी देखील भर दयावा लागणार आहे. उदयोगधंदयांच्या स्वरुपात योजना राबवित असताना प्रत्येक योजनेमध्ये व प्रक्रियेमध्ये कामगारांना देखील सहभागी करुन घेण्यावरती भर देण्यात यावा. त्याचबरोबर पुरुषांच्या बरोबरीने कामगार महिलांच्या देखील समस्यांची सोडवणूक करण्यात आली तरच सर्व समावेशक कामगारांचा विकास या कामगार चळवळीची संकल्पना साकार होणार आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१. डॉ. कठारे अनिल- आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, जून १९९८
२. कदम मनोहर- नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र
३. चक्रवर्ती दिनेश- नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र
४. गाठाळ एस.एस.- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जून २००५
५. जावडेकर आचार्य- आधुनिक भारत
६. वैद्य कोठेकर- आधुनिक भारताचा इतिहास

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.